# त्या कळ्या



त्या तुझ्या उंबऱ्यावरती
मी कळ्या ठेवल्या होत्या
झाली फुले तयांची ?
कोमेजून गेल्या का त्या ?

मी उंबऱ्यात अडखळलो
माघारी तेथून फिरलो
नि:श्वास काळ्यांचा का त्या
तुज समजाऊन घेता आला ?

मी दूर दूर जाताना
अवचीत मागे वळलो
त्या धूसर वाटांवरती
कोलाहल झाला होता

वळणांच्या पुढती वळणे
तू अनोळखी झालीस
अशी त्याच उंबऱ्यावरती
परतून जरी आलीस

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/